# सायकलिंग असोसिएशन ऑफ़ महाराष्ट्र

संलग्न: सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया नवी दिल्ली आणि महाराष्ट्र ऑलम्पिक असोसिएशन

नोंदणी सोसायटीज रजिस्ट्रेशन. ॲक्ट १९६० आणि बॉम्बे पी.टी.ए. १९५० नं.६९४/१६ आणि एफ/२४६८९

ॲड. विक्रम रोठे — अध्यक्ष

प्रा.संजय साठे — सचिव

## "राष्ट्रीय रोड सायकलिंग स्पर्धेसाठी निवड चाचणी स्पर्धा"

**दिनांक: ०३ ऑक्टो २०२५**

प्रती,

**मा. अध्यक्ष / मा. सचिव**

सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रला

संलग्न सर्व जिल्हा संघटना / क्लब / सायकलपट्टू व संबंधीत सर्व

स.न.वि.वि.

**विषय :- ३० व्या राष्ट्रीय रोड सायकलिंग स्पर्धेसाठी निवड चाचणी स्पर्धे बाबत ...**

महोदय / महोदया,

१) सायकलिंगअसोसिएशन ऑफ महाराष्ट्रला संलग्न असलेल्या सर्व सभासद, सायकलिंग जिल्हा संघटनांचे नोंदणीकृत सायकलपट्टू व संबंधीतांसाठी.......

२) सायकलिंग फेडरेषन ऑफ इंडियातर्फे सन २०२५-२६ ची **३० वी राष्ट्रीय रोड सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धा ओडीसा येथे ०२ ते ०६ डिसेंबर २०२५ दरम्यान होणार आहे.** या ३० व्या राष्ट्रीय रोड सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघाची निवड चाचणीचे **बुधवार ०५ नोव्हेंबर २०२५ रोजी आहिल्यानगर येथे टाईम ट्रायल (Time Trial) प्रकारात आयोजन करण्यात येणार आहे .**

२.१ स्पर्धा दिनांक व वेळ - **बुधवार ०५ नोव्हेंबर २०२५ रोजी** सकाळी ६:०० वाजता स्पर्धा ठिकाणी सर्व सूचना व BIB क्रमांक देण्यात येतील. सायकलपट्टू, पालक, प्रशिक्षक, व्यवस्थापक यांनी हजर राहणे आवश्यक आहे.

**स्पर्धा ठिकाण - अहिल्यानगर (अहमदनगर - पाथर्डी मार्गावर चाँदबीबी महाल बायपास डीएसपी चौकापासून चाँदबीबी महाल सुमारे १० किमी अंतरावर आहे.) लिंक रोडवर (चाँदबीबी महाल ते वाळुंज) या मार्गावर होईल.**

२.२ RIN साठी नांव नोंदणी: सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रकडे (CAM) सन २०२४-२५ साठी नांव नोंदणी करुन (RIN-नंबर घेतलेल्या ) सायकलपट्टूंना या निवड चाचणी स्पर्धेमध्ये भाग घेता येईल.

२.३ ज्या सायकलपट्टूंनी अद्याप सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रकडे नोंदणी केलेली नाही किंवा नूतनीकरण केलेले नाही त्यांनी प्रथम सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या व्हाट्सअप ग्रुप वरील लिंकद्वारे नोंदणी करुन घ्यावे.

२.४ स्पर्धेसाठी नांव नोंदणी (Entry) लिंकद्वारेच (ऑनलाईन) करावी.

२.५ सायकलपट्टूने सीएफआय चे रायडिंग लायसेन्स काढून घेणे बंधनकारक नाही. मात्र भविष्यात ज्या सायकलपट्टूंची निवड राष्ट्रीय स्पर्धेसाठी होईल त्यांना सीएफआय लायसन्स तयार करुन घेणे बंधनकारक आहे .

२.६ **वयाच्या पुराव्यासाठी नोंदणी अर्ज व्यवस्थीत वाचून त्याची पूर्तता करावी.**

२.७ **स्पर्धेसाठी नांव नोंदणी बाबत** - स्पर्धेसाठी प्रवेशिका लिंकद्वारेच भरावयाची आहे इतर कोणत्याही माध्यमाद्वारे स्पर्धेच्या प्रवेशीका स्वीकारण्यात येणार नाहीत.

२.८ **प्रवेश अर्ज ( Entry )भरण्याची अंतिम दिनांक गुरुवार ३० ऑक्टोंबर २०२५ पर्यंत ऑनलाईन पद्धतीने राहिल.**

३) सायकलपटूंनी निवास व भोजन व्यवस्था स्वत:ची स्वत: करावयाची आहे. निवड चाचणीमध्ये सर्व स्पर्धकांना स्वखर्चाने सहभागी व्हावे लागेल. कोणताही खर्च आयोजक / समिती उचलणार नाही.

४) स्पर्धा नोंदणी / खर्च फी प्रत्येकी प्रत्येक गटासाठी रुपये १०००/- राहील.पैसे सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या बँक खात्यामध्ये ऑनलाईन पद्धतीनेच जमा करावेत.

४.१ **भारतीय सायकलिंग महासंघाशी (सीएफआय) संलग्न असलेल्या सेनादल, रेल्वे क्रीडा मंडळ आदी संस्थांमधील खेळाडूंना तसेच महाराष्ट्र सोडून इतर राज्यातील सायकपट्टूंना या स्पर्धेत सहभागी होता येणार नाही. महाराष्ट्राचा अधिवासी असलेल्या सायकलपट्टूंनाच या स्पर्धेत सहभागी होता येईल.**

५) सर्व वयोगटात वैयक्तिक टाईम ट्रायल प्रकारात निवड चाचणी घेण्यात येईल व सर्वाधिक कमी वेळेत अंतर पूर्ण करणा-या सायकलपटूंची राष्ट्रीय स्पर्धेसाठी खेळाडूंची निवड करण्यात येईल.

६) **नियम / स्पर्धे दरम्यान पेनल्टी व ईतर :** भारतीय सायकलिंग महासंघ (CFI) आणि CAM (सायकलिंग असोसिएसन ऑफ महाराष्ट्र) यांच्या नियमांनुसार तसेच या नियमांत वेळोवेळी केलेल्या बदला नुसार ही निवड चाचणी घेण्यात येईल.

७) **स्पर्धे ठिकाणी व रीपोर्टिंग च्या ठिकाणी निर्धारीत केलेल्या वेळी हजर राहणे ही प्रत्येक सायकलपट्टूची जबाबदारी असेल.** स्पर्धा वेळेवर आणि RSO (Rider's Start Order) नुसार पार पडेल. स्पर्धे ठिकाणी किंवा रीपोर्टिंग ठिकाणी गर्दी करु नये.

८) स्पर्धा सुरु होण्याच्या ठिकाणी कोणत्याही कारणाने स्पर्धकास उशिर झाल्यास व BIB नंबर चुकिचा लावल्यास त्यास ५०० रु दंड आकारण्यात येईल.

९) प्रत्येक सायकलपटूची सायकल स्वत:ची असली पाहिजे. एक सायकल दोघा सायकलपट्टूंमध्ये वापरावयाची असेल तर रुपये १०० भरुन आगावू लेखी परवानगी घ्यावी लागेल. एक सायकल जास्तीत जास्त दोघां सायकलपट्टूंमध्येच वापरता येईल.

१०) एका सायकलपट्टूस एकाच वयोगटात सहभागी होता येईल. (अपवादात्मक परिस्थीतीत बदल करण्याचे अधिकार CAM ला आहेत.)

११) कोणत्याही सायकलपट्टूस योग्य हेल्मेट शिवाय निवड चाचणीमध्ये भाग घेता येणार नाही. प्रत्येक सायकलपट्टूचे स्वत:चे योग्य हेल्मेट आवश्यक आहे.

१२) एकाद्या सायकलपट्टूने स्पर्धेदरम्यान स्वत:च्या डोक्यामधून हेल्मेट काढल्याचे आढळल्यास किंवा हेल्मेटचा बेल्ट काढल्याचे आढळल्यास किंवा योग्य पद्धतीने हेल्मेट घातले नसल्याचे आढळल्यास त्या स्पर्धकास स्पर्धेमधून तात्काळ बाद करण्यात येईल.

१३) स्पर्धेदरम्यान स्पर्धकाने कोणत्याही कारणाने हॅण्डेलवरील दोन्ही हाथ सोडल्याचे निर्दर्शनास आल्यास त्याक्षणी त्या स्पर्धकाचा स्पर्धेमधील प्रवेश रद्द करण्यात येईल.

१४) एकदा स्पर्धा सुरु झाल्यानंतर स्पर्धा सुरु असलेल्या मार्गावर सरावासाठी किंवा वॉर्म अप साठी कोणाही सायकलपट्टूंने जाऊ नये. वॉर्मसाठी ठरवून दिलेल्या मार्गावर व ठिकाणी वॉर्मअप वा सराव करावा. **स्पर्धा सुरु असलेल्या मार्गावर सराव करणा-या सायकलपट्टूस १ (एक) मिनीटाची पेनल्टी किंवा ५०० रुपये दंड करण्यात येईल.**

१५) या निवड चाचणीसाठी आलेल्या स्पर्धकांनी स्पर्धा मार्गा शेजारील मार्गावर (ज्यावरुन वाहतुक सुरु आहे) त्यावर सरावासाठी किंवा वॉर्म अप साठी सायकलपट्टूंनी जाऊ नये. वाहतूक सुरु असलेल्या मार्गावर सायकलपट्टू आढळून आल्यास त्याचा या स्पर्धेमधील प्रवेश रद्द करण्यात येईल.

१६) स्पर्धा सुरु असताना स्पर्धा मार्गा शेजारील रोडवरुन (वाहतुक सुरु असलेल्या मार्गावरुन) एकादा सायकलपट्टू कसल्याही स्वरुपाचे सहाय्य / मदत प्रोत्साहन घेताना आढळल्यास अशा सायकलपट्टूस या स्पर्धेमधून बाद करण्यात येईल.

१७) स्पर्धेदरम्यान मागील सायकलपट्टूने पुढील सायकलपट्टूस पकडल्यास दोन सायकलपट्टूंनी एकेमेकाचा पेस करु नये. पेस करताना आढळल्यास **प्रथम (पुढे) सोडलेल्या सायकलपट्टूस दोन मिनीटांची पेनल्टी देण्यात येईल किंवा स्पर्धेमधून बाद करण्यात येईल. अशा वेळी पुढील सायकलपट्टूने किमान १५ मीटर्सचे अंतर ठेवले पाहिजे.**

१८ ) मागून आलेल्या सायकलपट्टूने पुढील सायकलपट्टूबरोबर लिड - पेस करताना आढळल्यास दोनही सायकलपट्टूस प्रत्येकी दोन मिनीटाची पेनल्टी देण्यात येईल

१९) स्पर्धेदरम्यान सायकलपट्टू कोणत्याही स्वयंचलीत वाहनाचा पेस करताना अढळल्यास त्यास अशा प्रत्येक प्रसंगी दोन मिनीटांची पेनल्टी देण्यात येईल दोन पेनल्टीनंतर त्या स्पर्धकास पुढील सहा महिने CAM च्या कोणत्याही स्पर्धेत सहभागी होता योणार नाही.

२०) सायकल पंचर असेल तरच री रन (पुन्हा खेळण्याची संधी) देण्यात येईल. पंचर सायकलसह प्रथम मुख्य पंचांना रीपोर्ट करावा लागेल. मुख्य पंच पहाणी करतील व नंतर री रन साठी परवानगी देतील.

२१) मुख्य पंचांकडे री रन साठी रुपये २०० भरुन परवानगी घ्यावी लागेल. री रनची एकच संधी मिळेल.

२२) पंचर शिवाय कोणत्याही कारणाने री रन हवा असेल तर रुपये ५०० मुख्य पंचांकडे जमा करुन री रन साठी परवानगी मागता येईल. परिस्थीतीचा आढावा घेऊन मुख्य पंच री रनचा निर्णय घेतील.

**२३) स्पर्धे दरम्यान सायकलपट्टूंना मोबाईल फोन अथवा कानामधील ऐकण्याचे मशिन (ईअरींग) वापरता येणार नाहीत . असे करतान खेळाडू आढळल्यास या स्पर्धेमधील संबंधीत सायकपट्टूचा सहभाग त्याक्षणी रद्द करण्यात येईल.**

**२४) नियमानुसार सर्व स्पर्धा ४० किमी अंतरापेक्षा कमी अंतराच्या आहेत. स्पर्धकाने स्वत:चे फिडींग स्वत:बरोबरच ठेवावे, बाहेरुन फिडींग वा पाणी घेऊ नये.** स्पर्धक स्वत:जवळील फिडींग वा पाणी वापरु शकतो.बाहेरुन फिडींग वा पाणी घेताना आढळल्यास ५०० रुपये दंड किवा स्पर्धेमधून निलंबन करण्यात येईल. **(अपवादात्मक परिस्थितीमध्ये पंच / पायलेट पाणी देऊ शकतात.)**

२५) कोणात्याही सायकलपट्टूने वा पालकांनी स्पर्धेतील पंच वा तांत्रिक अधिकारी वा पायलेट यांचेशी परस्पर कसल्याही स्वरुपाचा संवाद/संपर्क साधू नये. तसे आढळल्यास त्या सायकलपट्टूस एक मिनीटाची पेनल्टी देण्यात येईल. एकाद्या सायकलपट्टूच्या काही शंका असल्यास त्यासाठी मुख्यपंच किंवा सचिव प्रा.संजय साठे यांचेशी संपर्क साधावा.

२६) पंच किंवा तांत्रिक अधिकारी किंवा पायलेट यांच्या सूचनांचे जे सायकलपट्टू पालन करणार नाहीत अशा सायकलपट्टूस १ (एक) मिनीटाची पेनल्टी किंवा ५०० रुपये दंड आकारण्यात येईल.

२७) स्पर्धा सुरु होण्याच्या ठिकाणी किंवा स्पर्धा सुरु असताना कोणीही प्रशिक्षक, व्यवस्थापक, पालक किंवा स्पर्धकाशी संबंधीत इतर कोणीही स्पर्धेस अडथळा होईल, सायकलपट्टूस व्यत्त्यय होईल असे कोणतेही कृत्य करु नये तसे करताना आढळल्यास त्या व्यक्तीशी संबंधीत सायकलपट्टूवर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

२८) सर्वसायकलपट्टूंनी नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे बेशिस्त खेळाडू तसेच उद्धट खेळाडूविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल त्याच प्रमाणे प्रशिक्षक, व्यवस्थापक वा पालक यांच्यामुळे स्पर्धेत अडथळा आल्यास संबंधीतांच्या स्पर्धकावर स्पर्धेमधून निलंबनाची कारावाई करण्यात येईल .

२९) ज्या जिल्ह्याच्या खेळाडूंना स्पर्धा मार्गावर सराव करावयाचा आहे त्यांनी स्वखर्चाने व स्वत चे:जबाबदारीवर सराव करावयाचा आहे.

३०) स्पर्धेठिकाणी वा स्पर्धे दरम्यान कसल्याही प्रकारची हरकत असेल तर मुख्य पंचांकडे रुपये १००० (रुपये एक हजार) भरुन लेखी स्वरुपात तक्रार करावी.

३१) परीस्थीती व गरजेनुसार निवड चाचणीच्या वेळापत्रकात बदल होऊ शकतो जो सर्वांवर बंधनकारक राहील.

३२) एक मिनीटाच्या तीन पेनल्टी मिळालेल्या सायकलपट्टूस या स्पर्धेमधून बाद करण्यात येईल.

३३) **महत्वाचे :** आयत्यावेळी उदभवलेल्या कोणत्याही कारणाने स्पर्धा कार्यक्रमात बदल करण्याचे अधिकार सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र वा संयोजकांस आहेत हे सर्व बदल सहभागी सर्वांवर बंधनकारक असतील

३४) स्पर्धा संपल्यानंतर सविस्तर निकाल दुस-या दिवशी व्हाट्सअप ग्रुप जाहीर करण्यात येईल.

आपल्या जिल्ह्यामधील ईच्छूक सर्व सायकलपटूंना या निवड चाचणीच्या नियमांपासून अवगत करावे व सहकार्य कारवे.

कळावे, धन्यवाद !!

आपले विनीत

प्रा. संजय साठे
मानद सचिव

**प्रतमाहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी:**

१) ॲड. विक्रम रोठे .... अध्यक्ष, सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र

२) मा. सहसंचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे

३) मा. प्राचार्य, पुणे क्रीडा प्रबोधिनी, पुणे

### दिनांक ०५ नोव्हेंबर २०२५ रोजी होणा-या राज्यस्तरीय निवड चाचणी स्पर्धेसाठी वयोगट व अंतर.

Age group and Distance for the State Level Selection Trials

| अ.क्र.<br>Sr.No | वयोगट<br>Age Group | एकूण अंतर<br>Total Distance | लॅप्स्<br>Laps | पात्र जन्मसाल<br>Eligible birth year |
|---|---|---|---|---|
| १ | EM : Elite Men and<br>EW : Elite Women<br>१९ वर्ष व त्यावरील पुरुष व महिला. | पुरुषांसाठी :४२ कि. मी.<br>For Men : 42 Kms<br>महिलांसाठी :२८ कि. मी.<br>For Boys : 28 Kms | १४ किमी चे ३ लॅपस.<br>2 Laps of 14 Km each.<br>१४ किमी चे २ लॅपस.<br>2 Laps of 14 Km each.. | १९ वर्ष व त्यावरील पुरुष व महिला.<br>(सन २००५ आणि त्या अगोदर जन्मलेले)<br>**Men & Women 19 years and above (Born 2005 and earlier)** |
| २ | **MU 23: Men U/23**<br>२३ वर्षाखालील पुरुष.<br>**Men Under 23 yrs.** | पुरुषांसाठी : ४२ कि. मी.<br>For Men : 42 Kms | १४ किमी चे ३ लॅपस.<br>३ Laps of 14 Km each. | २००३, २००४, २००५ व २००६ या वर्षामध्ये जन्मलेले केवळ पुरुषांसाठी.<br>**Men Born in ,2003, 2004, 2005 and 2006.** |
| ३ | MJ : Men Junior. and<br>WJ : Women Junior.<br>वय वर्ष १७ आणि १८.<br>**Aged 17 and 18 years.** | मुलांसाठी : २८ कि. मी.<br>For Boys : 28 Kms<br>मुलींसाठी : २० कि. मी.<br>For Boys :20 Kms | १४ किमी चे २ लॅपस.<br>2 Laps of 14 Km each.<br>१० किमी चा १ लॅप.<br>1 Lap of 10 Km. | २००७ आणि २००८ या वर्षात जन्मलेले मुले आणि मुली.<br>**Boys & Girls Born in 2007 and 2008.** |
| ४ | Sub Juniors Boys and<br>Sub Juniors Girls.<br>वय वर्ष १५ आणि १६.<br>**Aged 15 and 16 years.** | मुलांसाठी : २० कि. मी.<br>For Boys :20 Kms<br>मुलींसाठी : १४ कि. मी.<br>For Boys : १४ Kms | १० किमी चा १ लॅप.<br>1 Lap of 10 Km.<br>१४ किमी चा १ लॅप.<br>१ Lap of १४ Km. | २००९ आणि २०१० या वर्षात जन्मलेले मुले आणि मुली.<br>**Boys & Girls Born in 2009 and 2010.** |
| ५ | Youth Boys and<br>Youth Girls.<br>वय वर्ष १२, १३ आणि १४.<br>**Aged 12, 13 and 14 years.** | मुलांसाठी : १४ कि. मी.<br>For Boys : १४ Kms<br>मुलींसाठी : १० कि. मी.<br>For Girls: 10 Kms | १४ किमी चा १ लॅप.<br>१ Lap of १४ Km.<br>१० किमी चा १ लॅप.<br>1 Lap of 10 Km. | २०११,२०१२ आणि २०१३ या वर्षात जन्मलेली मुले आणि मुली.<br>**Boys & Girls Born in 2011, 2012 and 2013.** |

**महत्त्वाचे:** या निवड चाचणी बाबत राज्यशासन, जिल्हाप्रशासन, स्थानिक प्रशासन किंवा पोलीस प्रशासन यांनी दिलेल्या सर्व सूचनांचे पालन करणे या निवड चाचणीमध्ये सहभागी होणा-या प्रत्येकाला बंधनकारक असेल.तसेच वेळोवेळी उद्भवणाऱ्या कोणत्याही महत्वाच्या कारणामुळे वरील वेळापत्रकात बदल संबंधितांनी सुचविल्यास ते या निवड चाचणीतील सर्व सहभागींना बंधनकारक असतील.

Important: Everyone will be bound to follow all the instructions given by the State Government, District Administration, Local Administration or Police Administration regarding this selection trials. Also, if due to any important reason arising from time to time, changes in the above schedule are suggested by the concerned authority, it will be binding on all the participants of this selection trials.